

# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ६ वा ❑ भारतीय सौर दिनांक १४ माघ शके १९४७, मंगळवार दि.०३ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## वर्षपूर्ती संपादकीय

### साहित्याची स्वप्नपूर्ती......

– संजय व्यापारी



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आमचे जेष्ठ लेखक, कवी, वाचक, सहकारी आणि माझ्या साहित्यप्रेमी बंधू-भगिनींनो, आजचा दिवस माझ्यासाठी आणि आपल्या सर्वांसाठी अत्यंत आनंदाचा, अभिमानाचा आणि कृतज्ञतेचा आहे. कारण आज आपल्या साहित्यप्रधान दैनिक पेपरचा पहिला वर्धापन दिन आपण साजरा करत आहोत.

एक वर्षापूर्वी, एका छोट्याशा पण प्रामाणिक स्वप्नातून या दैनिकाची सुरुवात झाली. ''साहित्य जपायचे, साहित्य वाढवायचे आणि साहित्य सामान्य माणसापर्यंत पोहोचवायचे'' हा आमचा एकमेव उद्देश होता. आज मागे वळून पाहताना, हे स्वप्न केवळ आमचे राहिले नाही, तर असंख्य लेखक, कवी, वाचक आणि विचारवंतांचे सामूहिक स्वप्न बनले आहे.

आजच्या धावपळीच्या, तंत्रज्ञानप्रधान युगात साहित्य वाचनाची सवय कमी होत चालली आहे, अशी तक्रार आपण नेहमी करतो. पण या दैनिकाने सिद्ध केले की आजही शब्दांना वजन आहे, विचारांना मूल्य आहे आणि साहित्याला भविष्य आहे.

या एका वर्षात आपण कथा, कविता, लेख, समीक्षा, वैचारिक लेखन, सामाजिक वास्तव आणि मानवी संवेदनांचे अनेक पैलू मांडले. नवोदित लेखकांना व्यासपीठ दिले, अनुभवी साहित्यिकांचा वारसा जपला आणि वाचकांशी प्रामाणिक संवाद साधला.

या प्रवासात अनेक अडचणी आल्या  आर्थिक, तांत्रिक, वेळेच्या आणि कधी कधी आत्मविश्वासाच्याही. पण वाचकांचा प्रतिसाद, लेखकांचा विश्वास आणि सहकाऱ्यांची निष्ठा यामुळे आम्ही कधीही थांबलो नाही.

आज या क्षणी मी मनापासून धन्यवाद देतो  आमच्या लेखकांना, ज्यांनी आपले विचार आमच्यावर विश्वास ठेवून दिले आमच्या वाचकांना, ज्यांनी रोज आम्हाला वाचून बळ दिले आणि आमच्या संपादकीय व तांत्रिक टीमला, ज्यांनी पडद्यामागे राहून हा पेपर जिवंत ठेवला हा दैनिक केवळ एक वृत्तपत्र नाही, तर तो एक विचारांचा प्रवाह, एक साहित्यिक चळवळ आणि एक संस्कृती जपणारे माध्यम आहे. भविष्यात आम्हाला आणखी व्यापक व्हायचे आहे  अधिक दर्जेदार साहित्य, अधिक नवोदितांना संधी, आणि अधिक वाचकांपर्यंत पोहोचण्याचा निर्धार आम्ही आज या मंचावर करतो. शेवटी इतकेच म्हणेन की, साहित्य माणसाला माणूस बनवते, आणि जो समाज साहित्य जपतो, तो समाज कधीही दिशाहीन होत नाही. या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त, आपण सर्वांनी मिळून हा संकल्प करूया की  आपण साहित्य वाचू, लिहू, शेअर करू आणि पुढील पिढीसाठी ते जतन करू. सर्वांचे मनापासून आभार.

धन्यवाद!





# डिजिटल युगातील मराठी साहित्याच्या नव्या दिशा सर्वसमावेशक-डॉ. वि. ल. धारूरकर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : डिजिटल युगातील मराठी साहित्य अधिक परस्परावलंबी व समृद्ध होत आहे, असे विचार प्रसिद्ध विचारवंत आणि ज्येष्ठ साहित्यिक धारूरकर यांनी व्यक्त केले.

ऑनलाईन दैनिक ज्योतिर्मय साहित्यच्या वतीने आयोजित पहिल्या ज्योतिर्मय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पत्की होते.

प्रारंभी ज्योतिर्मयचे संपादक संजय व्यापारी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे संचालन आनंद काळे यांनी केले. याप्रसंगी डॉक्टर विल धारूरकर, पुण्यनगरीचे संपादक शेषराव पठाडे तसेच ज्येष्ठ गायक पंडित दीपक गिरी यांचा  स्मृतीचिन्ह व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. धारूरकर म्हणाले, नवीन सहस्रकांमध्ये प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर इंटरनेट तसेच मोबाईल क्रांती यामुळे साहित्य आता मौखिक दृश्राव्य व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अधिक नव्या व्यासपीठावरून प्रकट होत आहे. कथा, कविता आणि कादंबरी तसेच विनोदी साहित्याचे स्वरूप सुद्धा चित्रवाणी माध्यमांमुळे झपाट्याने बदलत आहे. साहित्य लघरूप धारण करत आहे आणि थेट सहभागामुळे मराठी साहित्यात वाचकांचा सहभाग वाढला आहे. चित्रवाणीवर सादर होणाऱ्या धारावाहिक मालिकेतील साहित्याची लोकप्रियता, त्यातील थेट सहभाग आणि प्रेक्षकांच्या जिवंत अभिव्यक्तीमुळे अधिक वाढत आहे. साहित्य, चित्रवाणी आणि चित्रपट या माध्यमांतून नाते अधिक सुसंवादी आणि परस्परपूरक ठरत आहे. मराठी साहित्याची ई-बुक्स आणि ऑडिओ स्वरूपातील उपलब्धता यामुळे वाचकांचा सहभाग अधिक वाढत आहे. जगातील १५२ देशांत मराठी माणूस पोहोचला आहे. त्याबरोबर साहित्याची व्याप्तीही वाढली आहे



आणि केवळ ग्रामीण महानगरी साहित्यापेक्षाही वैश्विक मराठी डायओस्पोरा हा नवावाचक नव्या जाणिवा घेऊन प्रकट होत आहे. जगातील अनेक देशांतील महाराष्ट्र मंडळाच्या साहित्यविषयक अभिरुचींचा अभ्यास केला असता, त्यातील बदलते प्रवाह सूक्ष्मपणे लक्षात येतात. ज्ञानपीठ पुरस्कार साहित्य असो की, विविध साहित्य परिषदांच्या पुरस्कारामुळे सन्मानित झालेले साहित्य असो, त्यांचा खरा दर्जा हा व्यापक लोकसहभागावरूनच स्पष्ट होईल असेही त्यांनी सांगितले. इंटरनेट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमामुळे साहित्य समीक्षेची दालने अधिक विस्तृत होत आहेत, अधिक चिकित्सक होत आहेत आणि त्यातील वाचकांची श्रेयस, प्रेयस याबाबतची परिमाणेही बदलत आहेत. आता मराठी साहित्याला जागतिक साहित्याबरोबर स्पर्धा करून आपला सकसपणा आणि दर्जा अधिक सिद्ध करावा लागेल. केवळ भारतीय भाषा साहित्यातील स्पर्धा ही आता अपुरी ठरत आहे. साहित्यातील वैश्विक मानवी मूल्ये, भाव, संवेदना आणि मानवतेचा संघर्ष आणि सामाजिक व आर्थिक न्यायासाठी होत असलेले संघर्ष हे सुद्धा साहित्याचा केंद्रबिंदू बनत आहेत. समरसता हे मानवी मूल्य घेऊन भारतीय साहित्य वैश्विक पातळीवर पोहोचू शकते. त्या दृष्टीने विचार करता भारतीय साहित्याला नवी परिमाणे प्राप्त करून दिली पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी प्रा. मंगला वैष्णव यांनी त्यांच्या तीन अनुवादित कविता सादर केल्या आणि वाचकांनी त्याला उत्तम प्रतिसाद दिला.

शेवटी मान्यवर निमंत्रित कविंचे कवी संमेलन पार पडले, त्यामध्ये कवि संमेलनात सहभागी मान्यवर कवी – डॉ. मंगला वैष्णव, रंजन कंधारकर, नारायण पांडव, प्रिया धारूरकर, ज्योती सोनवणे, सुनील उबाळे, हबीब भंडारे, रमेश रावळकर, विवेक जोशी, बलराज संघई, अरविंद कुळकर्णी, किशन वसेकर, अनंत दसरे यांनी कविता सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. ज्योतिर्मय साहित्यच्या या उत्सवास विवेकानंद विचार मंचचे अध्यक्ष श्री विजय जोग व त्यांचे सर्व सहकारी तसेच वॉकर्स ग्रुपचे अध्यक्ष श्री रामरूले सर, डॉ. शिवाजीराव धनवले सर, पिंगळे सर, चौधरी सर, सिरसाठ सर, श्री  बल्लाळ काका  डॉ श्यामसुंदर कुडे सर, डॉ रामदास सकपाळ सर  श्री रमेश  बुरांडेसर श्री गोरक्षनाथ शिरसे,  श्री जयकुमार भोईरेकर श्री झिंगाडे सर, श्री दौलतराव म्हस्के सर  श्री अश्विन कुमार खुल्लर सर, श्री रमेश जोशी व रसिक वर्ग मोठ्या प्रमाणात हजर होता

# वारी आणि बारीतून लोकमनाची मशागत; डॉ. शेषराव पठाडे यांचे प्रतिपादन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्राला वारी आणि बारीची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. या दोन्ही माध्यमातून लोक जागृती आणि समाज जागृती साधली जाते. एवढेच नव्हे तर वारी आणि बारीद्वारे लोकमनाच्या मशागतीतून महाराष्ट्राची जडणघडण झाली असल्याचे प्रतिपादन शाहिरी वाङ्मयाचे अभ्यासक, जेष्ठ पत्रकार डॉ. शेषराव पठाडे यांनी येथे केले.

डिजिटल दैनिक ज्योतिर्मय च्या प्रथम वर्धापनदिन कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पठाडे बोलत होते. यावेळी त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर, ज्येष्ठ गायक दीपक गिरी, डॉ. मंगला वैष्णव यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. पठाडे यांनी ''वारी आणि बारी'' या विषयावरील सप्रयोग व्याख्यानाची सुरुवात ''आधी गणाला रणी आणा हो नाहीतर रंग पुन्हा पुन्हा सुना सुना'' आणि ''लवकर यावे सिद्ध गणेशा, आतून कीर्तन वरून तमाशा'' या गणांनी केली.

डॉ. पठाडे म्हणाले, कीर्तन ऐकलं नाही आणि तमाशा पाहिला नाही तो मराठी माणूसच नाही. लोककला हा लोकप्रबोधनाचा जागर आहे. महाराष्ट्रातील असंख्य ज्येष्ठ-श्रेष्ठ लोककलावंतांनी लोकजागराची मशाल पेटती ठेवली आहे. कीर्तनाची आणि तमाशाची सुरुवातही मंगलचरणाने, गणेश वंदनाने होते आणि शेवटही ''माऊली गुरु माऊली..'' ने होते. याचे कारण म्हणजे ज्ञानोबा तुकोबांच्या विचारांचा आणि भगवंताच्या नामस्मरणाचा



मराठी मनावरील प्रभाव अभंग आणि अखंड आहे. प्रसिद्ध तमाशा कलावंत (स्व.) दत्ता महाडिक पुणेकर यांचे संत तुकाराम हे वगनाट्य आणि त्यातील तुकारामांचा वैकुंठगमनाचा प्रसंग पाहताना तमाशा रसिक भावविभोर होऊन अश्रू ढाळत. गुरुवर्य लावणीसम्राट ज्ञानोबा उत्पात म्हणत, अभंग हे मराठी शारदेच्या हातातील टाळ, तर लावणी मराठी शारदेच्या पायातील चाळ आहेत. सामाजिक विवेक जागे ठेवण्याचे काम वारी आणि बारीतून झालेले आहे. एवढेच नव्हे तर या दोन्ही लोककलांनी माणसं जोडली, विचार जोडले आणि समाजामध्ये विवेक उतरविण्याचे प्रभावी कार्य केले आहे. पेशवेकालीन शाहिरांनी केवळ शृंगारिक लावण्याच लिहिल्या नाही, तर अध्यात्मिक आणि देव-दैवतांच्या लावण्या लिहून लोकांचे प्रबोधन केले. पारंपरिक लावणी तमाशाचा वसा अनेकांनी जीवापाड जपला आहे. आज काही प्रमाणात हा प्रभाव खंडित झाल्यासारखं वाटत असला तरी कलेवर अपार जीवननिष्ठा असलेल्या अनेकांनी हा झरा अखंडपणे खराळता ठेवला आहे, त्याचेच फळ म्हणून यंदा प्रथमच ज्येष्ठ तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांना केंद्र सरकारने पद्मश्री हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मानित केल्यामुळे तमाशाला राजवैभव मिळाल्याचे सांगून पठाडे यांनी लावणीसम्राट ज्ञानोबा उत्पात यांची चला जेजुरीला जाऊ.. ही अध्यात्मिक आणि वाटलं होतं तुम्ही याल... ही शृंगारिक लावणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पत्की, सचिव प्रेमचंद तुल्ले, उपाध्यक्ष शैलजा देशपांडे, इंदू अरोरा, प्रमोद सुरडकर, भरत कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, किसन वसेकर, मीरा पत्की, वंदना देशमुख, अनुराधा सुभेदार, शैला मोहनपुरकर, चित्रा पिलखाने, सूर्यकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते.












समाजासाठी काहीतरी देणं लागतं आणि आपल्या हातूनही कुणाचा तरी जीव वाचावा, या उद्देशाने सुरू झालेल्या ॲम्ब्युलन्स हेल्प रायडर्स या चळवळीमुळे आज महाराष्ट्रभरात अनेकांना जीवनदान मिळत आहे.  ज्योर्तीमय साहित्याच्या वर्धापण निमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी  श्री मनोज जोशी, श्री प्रेमसिंग मोरे, श्री मंगेश वाघमारे, श्री प्रसाद कस्तुरे, श्री रुपेश देशपांडे या पदाधिकाऱ्यांचा स्मृतीचिन्ह व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.




## जात्यावरच्या ओव्या......

माणूसकी तुझी
नको सोडू रे माणसा,
धांडे म्हणती तया
बिन भरल्या कणसा ||४७८||

धांडे जळे भुरूभुरू
उडे राख वार्यावर
रातभर देई उब
खोड अंजन दमदार ||४७९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## ये दिल मांगे ( नो ) मोअर...




ज्योतिर्मय साहित्य

अशी अनेक दृश्यं आपल्या सभोवताली घडताना आपण पाहत असाल. कोट्यवधी रुपये खर्चून शीतपेयांच्या जाहिराती तयार केल्या जातात. चित्रपटसृष्टीतील मोठमोठे नट, नट्या, क्रिकेटपटू यांच्याकडून अशा जाहिराती करवून घेतल्या जातात. सलमान खान, शाहरुख खान, अनुष्का शर्मा, अमीर खान, रणबीर कपूर, ऐश्वर्या राय, हृतिक रोशन, अलिया भट्ट, करीना कपूर या सगळ्यांनी कुठल्या ना कुठल्या तरी शीतपेयाची जाहिरात केली आहे. सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर, कपिल देव यांनीही शीतपेयाची जाहिरात केली होती. यही हैं राईट चॉईस बेबी... असेच ते सांगत होते. धोनी, बुमराह सारख्या क्रिकेटपटूंनी शीतपेयांच्या जाहिरातीत भाग घेतला आहे. त्यांना या जाहिराती करण्याबद्दल लाखो रुपये मिळतात. आपल्याला काय मिळते ? उलट ही शीतपेये तुमच्या आमच्या खिशातून अलगदपणे पैसे काढून घेतात आणि त्या जोडीला आरोग्याचीही अपरिमित हानी करतात.



मल्टिप्लेक्सच्या, मॉल्सच्या जमान्यात कोकाकोला, पेप्सी आपली पेयं अनेक मल्टिप्लेक्स मालकांना नाममात्र किमतीत देत असताना, ते ही पेये ग्राहकांना वाटेल त्या किमतीला विकतात. घरून नेलेलं पाणी चालत नाही, तिथलंच बाटलीबंद पाणीच विकत घ्यावं लागतं. बायकांच्या पर्समध्येही हात घालून सिक्युरिटीज पाण्याची बाटली तर आणली नाही ना, हे तपासतात. हॉटेलमालकांना किंवा किराणा दुकानदारांना बऱ्याचदा शीतपेये ठेवण्यासाठीच फ्रिज त्या त्या कंपन्यांनी दिलेला असतो. प्रसंगी त्याचं विजेचं बिलही या कंपन्या भरतात. असे असूनही हे दुकानदार पेये थंड करण्यासाठीचे जादा पैसे ग्राहकांकडून आकारतात. छापील किमतीपेक्षा जास्त किंमत आकारायची नाही, असा नियम फक्त कागदावरच असतो. आपली फसवणूक होते आहे, असं आपल्याला वाटत नाही. रस्त्यावरच्या भाजीवाल्याकडून भाजी घेतल्यावर रुपया दोन रुपयांसाठी वाद घालणारे आपण शीतपेयं मात्र निमूटपणे दुकानदार सांगेल त्या किमतीला घेतो.

स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होत आली तरी देशवासियांना आपण शुद्ध पिण्याचे पाणी पुरवू शकलो नाही.


अनेक ग्रामीण भागातील जनता आज तहानलेली आहे. अनेक ठिकाणी आमच्या भगिनी एक दीड किमी वरून पायपीट करून पाणी आणतात. बऱ्याच ठिकाणी विहिरींची पाणीपातळी खोल गेली आहे. तिथे जीव धोक्यात घालून पाणी भरावे लागते. अशी अनेक छायाचित्रे, व्हिडीओज आपण पाहत असतो. क्षण दोन क्षण हळहळतो आणि नंतर तो विषय सोडून देतो.

(क्रमशः)




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## गीता ही सर्व ग्रंथांची आई आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भगवद्गीता ही सर्व ग्रंथांची आई आहे. गीता ही वेदांपेक्षा श्रेष्ठ आहे. वेद हे देवाच्या नि:श्वासातून निघाले, तर गीता ही त्याच्या मुखातून निघाली. गीतेचा विषय कोणता ? गीतेचा विषय म्हणजे मोहाचा नाश करण्याचे तत्त्वदृष्ट्या आणि साधनदृष्ट्या विवेचन, हा होय. गीतेची सुरुवात म्हणजे अर्जुनाला मोह झाला; याचा अर्थ असा की, त्याला कर्तेपणाच्या अभिमानाने असमाधान उत्पन्न झाले, आणि त्यामुळे काय करावे आणि काय न करावे याची शंका त्याला उत्पन्न झाली. गीतेचा शेवट म्हणजे अर्जुनाचा मोह नाश पावला; याचा अर्थ असा की, कर्ता परमात्मा आहे हे निश्चित झाल्यामुळे जीवाच्या कर्माचे सुखदु:ख संपले. खरोखर, गीतेचे रहस्य सांगावे ज्ञानेश्वरमहाराजांनीच. भारतीय युद्धामध्ये परमात्मा पीतांबर नेसून, अर्जुनाच्या रथावर बसून, रणांगणावर अर्जुनाला गीता सांगते झाले. पुढे हजारो वर्षांनी, भगवंत कपडे बदलून आले आणि त्यांनी ज्ञानेश्वरी सांगितली. ज्ञानेश्वरी ही भगवंताची वाणी होय. त्यात सांगितल्याप्रमाणे आपण आचरण करावे. ‘ मी मागे आहे, तू पुढे चल. ’ हेच भगवंतांनी आपणा सर्वांना सांगितले आहे.

एखादी उपवर झालेली मुलगी जर आपल्या मैत्रिणीच्या लग्नाला गेली, तर तो समारंभ पाहून तिच्या मनामध्ये स्वत:च्या लग्नाचे आणि त्यातल्या सोहळ्याचे विचार येतील; त्याचप्रमाणे, आपण पोथी ऐकत असताना त्यामध्ये वर्णन केलेल्या अवस्था आपल्याला कशा येतील याचा विचार करावा. आत्मनिवेदन म्हणजे मी कोण आहे हे कळणे होय. प्रारब्धाच्या गतीने देहाला जी सुखदु:खे भोगावी लागतात, त्यांमध्ये आपण असल्यासारखे दिसावे, पण खरे मात्र नसावे. अशिलाचा खटला स्वत:चाच आहे असे समजून वकील कोर्टामध्ये भांडतो, पण खटल्याचा निकाल कसाही लागला तरी त्याचे सुखदु:ख मानीत नाही, वरून मात्र अशिलाजवळ दु:ख दाखवितो; अगदी असाच व्यवहार मी करतो. व्यवहार सत्य मानणाऱ्या लोकांत वावरायचे असेल, तर बाहेरून त्यांच्यासारखे वागणे जरूर आहे. असे वागत असताना आपले भगवंताचे अनुसंधान चुकू न दिले की व्यवहार हा खेळ बनतो. कधी हार तर कधी जीत ! खेळात आपण हरलो काय आणि जिंकलो काय, खऱ्या जीवनाच्या दृष्टीने सारखेच. तरी खेळ खेळताना मात्र तो जिंकण्याचा चांगला प्रयत्न करावा. भगवंताचे नाम घेतले की ही युक्ती आपोआप साधते. म्हणून रात्रंदिवस माझ्या माणसांना मी सांगतो की, वाटेल ते झाले तरी भगवंताचे नाम सोडू नका.

भगवंताच्या इच्छेने सर्व घडत आहे, ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे गीतेचे सार आहे.


***




♦अभंग 29 अर्थ♦

*पुढे .......*
*धर्मराजाने राजसूय यज्ञात कृष्णाला अग्रपूजेचा मान दिला, तेव्हा शिशुपालाने श्रीकृष्णाची अतिशय निंदा केली. म्हणून श्रीकृष्णाने आपणच त्यास मारले. ॥धृ॥*
*अतिश्रेष्ठ गुरु जे दुर्वास ऋषी, त्यांची श्रीकृष्णावर फार भक्ती होती,; त्यामुळे त्यास आपल्या रथात बसवून श्रीकृष्णाने रुक्मिणीसहित तो रथ घोड्याप्रमाणे ओढून नेला, त्या योगाने दुर्वासास मोठा अभिमान उत्पन्न झाला. त्या अभिमानाने त्याने महाभागवत भक्त जो अंबरीष राजा त्याला तीर्थ घेऊन द्वादशीचे पारणे सोडल्याबद्दल शाप दिला. तेव्हा दुर्वासाच्या पाठीमागे सुदर्शन चक्राचे कोलीत लाऊन त्याला त्र्यैलोक्यात हिंडावयास लाविलें श्रीकृष्णाने भारतीयुध्दात मी आता हातात शस्त्र धरणार नाही, अशी पैंज मारली होती. ती पैज एका बाजूस सारून हातात सुदर्शन घेतले; आणि भीष्मांचा पण खरा केला. हा जितका पांडवांना प्रिय होता तितकाच दुर्योधनासही प्रिय होता. ॥२॥*
*परशुरामाचा बाप जो जमदग्नी, त्याची बायको रेणुका हिला एकदा नदीहून येण्यास विलंब झाला; त्यामुळे जमदग्नीने रागावून आपला पुत्र जो परशुराम त्याला आपल्या आईस ठार मारण्यास सांगितले. आपल्या पित्याचा शब्द व्यर्थ न व्हावा अशी पितृभक्ती परशुरामाच्या ठिकाणी असल्यामुळें आपल्या पित्याच्या वाणीला सत्यपणा येण्याकरिता त्याने आपल्या आईस ठार मारले.*

*क्रमश:*



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## बध्दमुक्तनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

(दशक ७ समास ६

मुक्त व ज्ञानी पुरूष देहाने जगात वावरत असताना आपली ब्रम्हाकारता ढळूं देत नाहीत.

देहाच्या द्रुष्टीने त्यांची कर्मे सज्जनांच्या कर्मा प्रमाणेच असतात. त्यात कमीजास्त पणा असतो कारण हाताची बोटे एक सारखे नसतात हे आपल्याला माहिती आहे. परंतु मनाच्या आतली अवस्था स्थिर रहाते. मुक्त पुरूषाला त्याच्या देहावरून पहायचे नसते. तर त्याच्या ब्रम्ह रूपतेवर पहायचे असते. वेद पुराणे सांगतात ते विश्वसनीय आहे. शुक व वामदेव या दोघांच्या शिवाय अनेकांचा उध्दार यामुळेच घडला. शुकाने अनेक विषयावर विवेचन केले आहे तो मुक्त होता हे वेदवचन खरे मानले पाहिजे. तो लाकडा सारखा निर्जीव ब्रम्ह रूप नव्हता. श्रीमत भागवतात सांगितले आहे की योगेश्वर शुक जर काष्ठवत निर्जीव, ब्रम्ह रूप असता तर त्याला आत्मानात्मविवेक बोलून सांगता आला नसता. जो ब्रम्ह रूप होतो तो लाकडासारखा कर्मरहित होछन पडतो, हा अगदीच चुकीचा समज ठरेल.

शुक ब्रम्हस्वरूप असू न त्याने परीक्षित राजाला एवढे भागवत सांगितले.

## आरोग्य संजीवनी



### किडनी संदर्भात क्रियेटीनीन लेव्हल योग्य स्थितीत ठेवण्यासाठी खालील उपाययोजना करावी.....

ज्योतिर्मय साहित्य

किडनी संबधीत आजारात हे प्रमाण वाढले की किडनी फेल्युअरचा धोका तयार होतो यासाठी उपाययोजना...

१) मक्याच्या केसांना रोज उकळून ते पाणी कपभर प्या. २) कोथिंबीर रस घ्या. ३) कोबीचा रस घ्या.

४) दालचिनी पावडरचा काढा एक चमचा मध घालून घेणे. ५) प्लंबम ३० या होमिओपॅथी च्या चार चार गोळ्या रोज सकाळी घेणे. ६) पाणी भरपूर पिणे (३ ते ४ लिटर). ७) हलका व्यायाम करणे.

८) मासाहार टाळावा. ९) केमोमाईनच्या पानांचा काढा घेणे. १०) नेटल लीफ टी घेणे.

११) मुळ्याच्या पानांचा रस एक चमचा घ्या. (रोज)

१२) रोज उशीरासव घेणे तीन वेळा दोन चमचे समभाग पाण्यात. १३) चंद्रप्रभा वटी व मुत्रदोष नाशक वटी घेणे. १४) ब्राम्ही च्या पानांचा रस व काळीमिरी एकत्र घेणे. १५) जेवणातील प्रोटीन मात्रा बंद करून प्रोटीन फ्री डायट देणे. १६) उच्च रक्तदाब कंट्रोल मध्ये आणणे. १७) नशा, चहा, कॉफी बंद करणे. १८) पुनर्नवासव घेणे.

( ९ व १० मध्ये नमूद केलेली केमोमाईन व नेटल लिफ ही झाडे नर्सरीतून मिळतील)

किडनीचे आजार...

किडनी फेल्युअर विकारांवर अथवा किडनी अंशतः काम करते किंवा डायलेसिस सुरू असलेली मंडळी ही हे उपाय करु शकतात.

ही संपुर्ण पणे आयुर्वेदिक पध्दती असून याचे साईड इफेक्ट्स नाहीत...

१) चार लिटर पाणी उकळून पाव म्हणजे एक लिटर झाल्यावर ते पाजणे थंड करून आर ओ चे पाजू नका. एक लिटर पाणी दिवसभरात

२) क्रियेटीनीन वाढलेल, ब्लड युरीया वाढलेला आहे, डायलेसिस चालू आहे, पोटँशियम ची मात्रा अधिक झालेली आहे, ज्यांची किडनी हे पदार्थ मुत्रमार्गातून रिमुव्ह न करत असल्याने अंगावर एक प्रकारची सूज येते अशा सर्वांना गीलोय, गोखरू, पुनर्नवा पंचांग यांना घरी आणून चांगले कुटून दहा ग्रॅमच्या प्रमाणात एकत्रितपणे एक कप पाण्यात उकळून पाव कप झाल्यावर ते देणे. नर्सरीमध्ये ही झाडे सुध्दा मिळतात ती घरी लावून ही रस काढता येतो किंवा अनेक आयुर्वेदिक दुकानात हा रस मिळतो. ते न मिळाल्यास तिघांचे काढे बाजारात मिळतात. ते दोन दोन चमचे या प्रमाणात द्या पंधरा दिवसात रिपोर्ट मध्ये फरक दिसेल. दिवसात दोनदा देणे.

३) क्रियेटीनीन वाढलेल्याना मसालेदार पदार्थ, हेवी जेवण देऊ नका. जी गोष्ट वाढलेय ते कंटेन्ट असलेले पदार्थ देऊ नका. उदा. सोडियम, पोटँशीयम, युरिया वाढलेल्या मंडळींनी हे कंटेन्ट असलेले पदार्थ देऊ नका.

४) कपालभारती, अनुलोम, विलोम भसरीका दहा मिनिटे करायला सांगा.

५) हातावरील, पायावरील किडनीचे अँक्युप्रेशर पाँइंट दाबत जा.

तीन पेक्षा कमी क्रियेटीनीन असलेले मेंबर्स, तीन ते पाचमधील पेशंट ज्यांची किडनी सत्तर टक्के काम करते.अशा पेशंट यांना याचा लवकर रिझल्ट येतो.पण ही औषधे घेताना ही तुमच्या डॉक्टर ना अथवा स्थानिक वैद्याचा सल्ला घ्या. पण अनेक लोकांची डायलेसीस याने बंद होऊ शकतील हा विश्वास आहे.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

♦ *गर्वहरण* ♦

*नदीच्या काठावर एक नारळाचे झाड होते. या झाडावर लागलेल्या नारळांना एक प्रकारचा गर्व चढला होता. तो नेहमी येणा-या जाणा-या वस्तूंना चिडवायचा पण त्याचा स्वभाव सगळेजण ओळखून होते. त्यामुळे त्यालाच कोणीच प्रत्युतर देत नसत. नदीमध्ये पडलेल्या दगडांचा तर नारळ खूप अपमान करीत असे. एकदिवशी तो नदीतल्या दगडाला म्हणाला,'' तुझी किती केविलवाणी परिस्थिती आहे, पहा! इथेच पडल्या पडल्या झिजून झिजून जाशील पण नदीचे पाय काही तू सोडणार नाहीस. ही नदी तुला देते तरी काय रे, अपमानालाही काही परिसीमा असते की नाही, मला पहा कशा प्रकारे उंच जागेवर आणि उच्च पदावर बसविले आहे.'' दगडाने त्याची बडबड ऐकून घेतली पण तो काही बोलला नाही. दोघेही आपापल्या स्थानी निघून गेले नारळ आता पूजेच्या थाळीत गेला होता. मंदिरात गेल्यावर नारळाने पाहिले की नदीतला दगड आता पूजास्थानी पोहोचला होता व शाळीग्राम म्हणून लोक त्याला पूजत होते. नारळाचा खूप संताप झाला की एका य:कश्चित दगडाच्या पूजेसाठी आपल्याला आणले गेले आहे पण तो काहीच करू शकत नव्हता. दगडाने त्याची मनस्थिती ओळखली व म्हणाला,'' नारळा, पहा झिजल्याचा कोणता परिणाम होतो. तेव्हा कधीच गर्व बाळगू नकोस.''*
*तात्पर्य : वेळ सारखी राहत नसते. गर्वाने वागणा-यांवरही कधी ना कधी मान खाली घालण्याची परिस्थिती येऊ शकते.*

# उत्सव साहित्याचा या साहित्य सोहळ्याची काही बोलकी छायाचित्रे



# बालसाहित्याकडे द्या विशेष लक्ष; जिल्हाधिकाऱ्यांची साहित्यिकांना साद

## भरपूर वाचनानंतरच लेखनाकडे वळावे-संमेलनाध्यक्ष डॉ. विशाल तायडे





**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - साहित्य हे मानवी जीवनाला आकार देणारे प्रभावी माध्यम आहे. समाजातील दोषांवर प्रहार करत विकृत प्रवृत्तींना वठणीवर आणण्याचे कार्य साहित्य करते. मात्र या समग्र साहित्याचा खरा पाया म्हणजे बालसाहित्य होय. त्यामुळे बालसाहित्याकडे विशेष लक्ष देणे हे प्रत्येक साहित्यिकाचे आद्यकर्तव्य आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

जैन इंटरनॅशनल स्कूल, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पहिल्या जिल्हा बालसाहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी साने गुरुजींचा संदर्भ देत सांगितले की, ''साने गुरुजी समजून घ्यायचे असतील तर साने गुरुजींच्या आईच्या भूमिकेतून पाहावे लागते. आईला बाळाच्या मनाची, त्याच्या हृदयाची खोल जाण असते. त्या हृदयाला स्पर्श करून साहित्यिकांनी नवनवीन साहित्यकृती निर्माण कराव्यात,'' असे भावपूर्ण आवाहनही त्यांनी केले.

संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ बालसाहित्यिक डॉ. विशाल तायडे यांनी मुलांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्याची गरज अधोरेखित केली. ''मुलं वाचती होण्यासाठी शिक्षक आणि पालकांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच लेखकांनी लिहिण्यापूर्वी भरपूर वाचन केले पाहिजे. सखोल वाचनानंतरच लेखनाला सुरुवात करावी,'' असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

या संमेलनात विद्यार्थ्यांनी कथाकथन, नाट्यछटा, वादविवाद तसेच कवी संमेलनाच्या माध्यमातून आपली साहित्यिक व कलात्मक प्रतिभा सादर केली. या प्रतिभेच्या बळावर केवळ विद्यार्थ्यांचेच नव्हे, तर देशाचेही भविष्य उज्ज्वल होईल, असाआशावादी सूर उपस्थित साहित्यिकांमधून व्यक्त झाला.

संमेलनाच्या स्वागताध्यक्ष तथा शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर-पानसरे यांनी शिक्षकांसोबतच विद्यार्थ्यांसाठीही साहित्य संमेलनाची चळवळ अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला.

संमेलनाची सुरुवात पारंपरिक ग्रंथदिंडीने करण्यात आली. वारकरी संप्रदायाच्या पारंपरिक वेशभूषेतील सहभागींनी ग्रंथदिंडीला विशेष शोभा आणली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित साहेब यांनीही मार्गदर्शन केले. संमेलनास प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या संचालिका शैलजा दराडे, डायटचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. सुनीता राठोड, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

कथाकथन सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. हबीब भंडारे होते. उपशिक्षणाधिकारी दीपाली थावरे व शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप चौरे यांची प्रमुख उपस्थिती होती. नाट्यछटा सत्राचे अध्यक्ष मा. रमेश ठाकूर होते तर उपशिक्षणाधिकारी सीमा मेहेत्रे आणि कवी सुनील डोके प्रमुख म्हणून उपस्थित होते.

वादविवाद सत्राचे अध्यक्ष व्याख्याते व लेखक डॉ. संजय गायकवाड होते तर शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवयित्री आशा डांगे होत्या तर राजीव मासुरळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारोप सत्राचे अध्यक्षपद ज्येष्ठ बालसाहित्यिक डॉ. लीला शिंदे यांनी भूषविले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी सिताराम पवार, कल्पना पदकोंडे आणि मनीषा वाशिंबे उपस्थित होते.

या संमेलनात सर्व तालुक्यांतील, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा लक्षणीय सहभाग नोंदविण्यात आला. या संमेलनात एकूण ३०० कुमार साहित्यिकांनी आपल्या सादरीकरणातून प्रगल्भ साहित्यिक अभिव्यक्ती साकार करत उपस्थितांची दाद मिळवली.

जिल्हाधिकारी रमले बालकलावंतात

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी प्रेक्षकात बसलेल्या वारकरी वेशभुषेतील बालकाला आपल्या जवळ बोलावून व्यासपीठावर आपल्या शेजारी बसविले. त्यानंतर एका बालकलाकाराच्या आग्रहास्तव भजनही गायले.

## वर्षपूर्तीबद्दल प्रतिक्रिया...

''लेखणी जेव्हा अनुभवाच्या शाईत भिजते, तेव्हा साहित्याचा खरा उत्सव साजरा होतो. आज मा. श्री. संजय व्यापारी सरांचा सत्कार करताना आपण त्यांच्यातील केवळ एका ''संपादकाचा नाही, तर एका अखंड ज्ञानसाधकाचा गौरव करत आहोत. त्यांच्या मार्गदर्शनाने मराठी साहित्य अधिक समृद्ध होत राहो, हीच सदिच्छा!''

**- सीमा गाडेकर**

आपण आपला हा एक वर्षाचा प्रवास अतिशय समर्पक व सुंदर शब्दात व्यक्त केला आहे. खरं तर ,कुठल्याही जाहिराती विना असे वर्तमानपत्र नियमित चालविणे महाकठीण काम ,कारण कुठल्याही कामाला पैसा हा लागतोच. पण आपल्या हातून माय मराठीची साहित्य सेवा घडावी व इतर नव साहित्यिकांना प्रकाश झोतात आणावे,या शुद्ध हेतूने आपण हे कार्य विविध अडचणीवर मात करत अखंड चालू ठेवले आहे. सोबतच आपण साहित्यिकांना अल्प दरात सेवा देत आहात याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

आपण व्यक्त केलेल्या आपल्या मनोगतात आपला वांबद्दलचा आदरभाव,आपुलकी व स्नेह जाणवला आपला हा साधेपणा खूप काही सांगून जातो सर्वांना घेऊन आपण चालू ठेवलेला साहित्य दीप असाच अखंड तेवत रहावा ,तेजोमय झगमगीत रहावा यासाठी आपल्याला खूप खूप शुभेच्छा या एक वर्षपूर्तीच्या सुवर्ण सोहळ्याचे मला प्रत्यक्ष साक्षीदार होता आले नाही, याची खंत आहे पण आपण हा व्हिडिओ पोस्ट केल्यामुळे

त्याची अनुभूती घरी राहून घेता आली,याचा आनंद नक्कीच आहे.

आपल्याला पुनश्च शुभेच्छा

**- गिरीश वसेकर**
नांदेड सिटी,पुणे

# वडिलांच्या मरणोत्तर कार्यासाठी वडपाडा सु. गावातील गावित कुटुंबाचा क्रांतिकारी निर्णय

## वडिलांच्या नावाने (कै.केशव गंगाराम गावित स्कॉलरशिप) तसेच गावातील सर्वात जेष्ठ व्यक्तीस मदत निधी सुरुवात

**ज्योतिर्मय साहित्य**

आमचे वडील कै.केशव गंगाराम गावित (माजी पोलीस पाटील) यांनी वडपाडा सु.या आपल्या गावासाठी तसेच पंचक्रोशीतील नव्हे तर तालूक्यातील सर्वच गावांसाठी समाजसेवा म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. गावातील तसेच ग्रुप ग्रामपंचायत मधील पोलीस पाटील हे पद सांभाळत असतांना सर्वांना समानतेची वागणूक, गावातील एकोपा, दारूबंदी, तंटामुक्त गाव, गावातील पाणीप्रश्न, गावातील रस्ता, गावातील लाईट सुविधा इ. आणि इतर विविध असे प्रश्न त्यांनी माणुसकीने आणि निष्ठेने हाताळत पूर्णत्वास नेले.

कोणत्याही व्यक्तीस कधी दुखवले नाही. गावामध्ये भांडणे वैगरे झाली तर ती कधीच पोलीस स्टेशन पर्यंत जाऊ दिले नाही, ती गावामध्येच बसून दोन्ही लोकांच्या सहभागाने सोडवीत असत. एखादा व्यक्ती जेवायच्या वेळेस घरी आला तर त्याला जेवण करूनच पाठवायचे. तालुक्यामध्ये तसेच गावामध्ये एक वेगळे वजन होते, वडील सांगायचे ती पूर्व दिशा असा त्यांचा शब्द होता. स्वतःला सतत सत्कार्याला वाहून घेत कुटुंबामध्ये वारकरी संप्रदायाची घट्ट पकड ठेऊन गावामध्ये व इतरत्र संप्रदायाची मुळे उंच करण्यात त्यांनी यशस्वी वाटचाल केली. अशा पद्धतीने खूप आठवणी आहेत, कार्याचा लेखाजोखा शब्दात कधीच न मांडता येणारा असे वडिलांचे कार्य होते.




आज आमचे वडील आमच्यासोबत आणि आपल्यासोबतही नाहीत परंतु त्यांचे माणुसकीचे आणि समाजसेवेचे कार्य शेवटपर्यंत जिवंत ठेवण्यासाठी तसेच येत्या ४ फेब्रुवारी ला वडिलांचे दुसरे पुण्यस्मरण आहे त्याच पार्श्वभूमीवर आम्ही संपूर्ण गावित कुटुंब सर्व परिवार त्यांच्या नावाने (कै.केशव गंगाराम गावित स्कॉलरशिप) आपल्या वडपाडा सु.गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तसेच गावातील सर्वात जेष्ठ व्यक्तीस मदत निधी सुरुवात करीत आहोत.

स्कॉलरशिप आणि मदतनिधी स्वरूप पुढीलप्रमाणे

इयत्ता पहिलीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास- ५०० रु., इयत्ता दुसरीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास- ७०० रु., इयत्ता तिसरीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास- ९०० रु., इयत्ता चौथीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास- ११०० रु., गावातील सर्वात जेष्ठ व्यक्तीस मदत निधी - ११०० रु. (दरवर्षी व्यक्ती बदलून) (जेष्ठ व्यक्ती निवडीचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीस).

आम्हाला असे वाटते कि, आम्ही गावित कुटुंबाने गावातील शाळेतील विद्यार्थ्यांसाठी घेतलेला वडिलांच्या नावाने स्कॉलरशिप हा जो काही निर्णय आहे तो निर्णय क्रांतिकारी असेल, असा निर्णय घेणारे गावित कुटुंब हे तालुक्यातील पहिलेच कुटुंब असेल असे वाटते. ह्या स्कॉलरशिप तसेच मदत निधीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी लागून स्पर्धात्मक वातावरण तयार होऊन विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी, तसेच स्पर्धेमध्ये टिकून राहावे व स्पर्धा जिंकून शाळेचे तसेच गावाचे नाव उंच करतील अशी भावना आहे. तसेच गावामधील सर्वात जेष्ठ व्यक्तीस प्रत्येक वेळी बदलून मदतनिधी देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. सदरची स्कॉलरशिप व मदतनिधी देण्याचा आमचा निर्णय फक्त समाज सेवा बाकी काही नाही, माणूस म्हणून जन्माला आलोय तर थोडं माणूस बनूनही बघूया हा संकल्प आणि वडिलांचा समाजसेवेचा वसा चालू ठेवण्यासाठी त्यांचे कार्य जिवंत ठेवण्यासाठी हा निर्णय घेतला आहे, सदरची स्कॉलरशिप व मदतनिधी दरवर्षी १५ ऑगस्ट या दिवशी रोख स्वरूपात देण्यात येईल असे प्रा.भगवान केशव गावित व त्यांच्या भावंडानी सांगितले आहे.

# पुस्तक विकत घेऊन वाचल्यावरच खऱ्या अर्थाने वाचक होण्याचा अधिकार : फमु शिंदे

## सदा सतेज कवितासंग्रहाचे प्रकाशन




**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : जिथे सूर असतात, तिथे शब्द असतातच. आयुष्यात किंमत मोजल्याशिवाय कोणत्याही गोष्टीला महत्त्व नसते म्हणून पुस्तक विकत घेऊन वाचा, कारण तेव्हाच तुम्ही खऱ्या अर्थाने वाचक होता, असे आवाहन कवीवर्य फ. मुं. शिंदे यांनी रविवारी, १ फेब्रुवारी रोजी केले. काव्यलेखनाला म्हणजेच निर्मितीला अनुभव आणि सद्भावनेची गरज असते, याची अनुभूती काव्यवाचनातूनच मिळते, असे फमु म्हणाले.

कवी फ.मुं. शिंदे यांच्या हस्ते संगीतकार विश्वनाथ ओक लिखित सदा सतेज या कवितासंग्रहाचे प्रकाशन रेल्वेस्टेशन रोडवरील भानुदास चव्हाण सभागृहात थाटात झाले. यावेळी डॉ. नरेंद्र वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. पुस्तक विक्रीतून येणारी रक्कम आस्था फाऊंडेशनला दान केली जाणार असल्याचे ओक यांनी जाहीर केले.

काव्यगायन रंगले

यानंतर सदा सतेज या कवितासंग्रहातील कवितांचे गायन चांगलेच रंगले. यामध्ये अनिता मुळे, अश्विनी जोशी, अंजली मुटाटकर, उमा मेहरोत्रा, तृष्णा ओक, प्रज्ञा कुलकर्णी, प्रियंका आचार्य, ममता कुलकर्णी, मोहिनी देशपांडे, मंजिरी कर्णिक, योगेश्वरी शेवतेकर, राजश्री ओक, राजश्री पुरोहित, सुजाता सामल, सुनीता पिंप्रीकर, अमित ओक, अर्णव ओक, इंद्रनील ओक, पार्थ ओक तसेच पाहुण्या कलाकार माधुरी ओक यांनी सहभाग घेतला. या

वादनाची साथ अमित ओक, अजय तायडे, अमर वानखेडे, गिरीश काळे, गजानन धुमाळ, जितेंद्र साळवी आणि विनोद वाव्हळ यांनी दिली. नीता पानसरे-वाळवेकर, पल्लवी कुलकर्णी, अविनाश ठिगळे, दीपाली कुलकर्णी, नम्रता लालसरे, प्रशांत नानकर, प्रेषित रुद्रवार, महेश अचिंतलवार, लक्ष्मीकांत धोंड यांनी कवितावाचन केले. मान्यवर गायक व कवयित्रींना फुलांची रोपे भेट देऊन सन्मानित करण्यात आले. सुनीता पिंप्रीकर यांनी सूत्रसंचालन केले, अमित ओक यांनी आभारप्रदर्शन केले.

मूल मराठी लेखक-सचिन वसंत पाटील हिन्दी भावानुवाद-डॉ. मीना श्रीवास्तव

# मेहनत की रोटी

आगे.........

उसने तासगांव मणेराजुरी का चक्कर लगाया और वहाँ एक अंगूर के बाग का मुआयना करके आया। वहाँ उगे अंगूरों की गुणवत्ता तो निर्यात करने योग्य थी और आने वाली आय भरपूर थी। उसके आंकड़े सुनते ही उसकी आँखें फटी की फटी रह गईं। सोचा बस एक साल ऐसी फसल पैदा हो, तो सारी विपदा मिट जावेगी। और पांच दस साल की आय में अगली पीढ़ी घर बैठे खा पी लेगी। इसी आस के रंगीन सपने को बुनने हुए उसने अंगूर की बाग़ लगाने का फैसला किया। घर की दुधारू गायें बेच दीं, और तो और बैंक से कर्ज लिया, यहाँ-वहाँ से थोड़े बहुत पैसे उधार लिए और विनायक अंगूर के बगीचे का मालिक बन बैठा!

पहले दो वर्षों तक, उसे कर्ज का मामला मामूली लगा। उसे उम्मीद थी कि अगर अंगूर की फसल एकाध साल भी अच्छे से पक गई, तो पूरा ऋण चुकता हो जाएगा। लेकिन धीरे-धीरे, राई के पहाड़ की तरह, ब्याज दर बढ़ती गई और अब महीने दर महीने चक्रवृद्धि ब्याज को अपने अंदर समाहित करता कर्ज का आंकड़ा एक पहाड़ की भांति उसकी छाती पर जम कर बैठ गया।

कर्ज़ जम कर बढ़ता रहा, परन्तु बाग-बगीचे का ताल-मेल बिलकुल भी नहीं जम रहा था। तीन साल बीत गए, पर एक भी फसल हाथ नहीं लगी। वह हाथ पर हाथ धरे ख़ामोशी से घर पर बैठा रहता । उसकी पत्नी उसे धीरज देते हुए समझाने की कोशिश करती रहती थी।

"कुछ न कुछ तो होगा, आप चिंता मत कीजिये।"

"चिंता न करूँ तो क्या करूँ? सब के बाग़ बगीचे देखो कैसे फल -फूल रहे हैं! हमारे ही गले में यह भारीभरकम पत्थर क्यों लटका है भला बताओ?"

"होता है ऐसा कभी कभी... हमारे ही भाग फूटे हैं तो हालात कैसे सुधरेंगे?"

इस प्रकार पति-पत्नी में बातचीत होती रहती थी।

लेकिन इस साल घर का पूरा सफाया हो गया। उसने बची खुची पाई पाई बगीचे में छिड़कने वाली कीटनाशक दवाइयों पर खर्च कर दी। लगा था कि ऐसा करने से कम से कम इस साल तो बगीचा अच्छा उगेगा और वह बैंक के कर्ज से मुक्त हो जाएगा। लेकिन इस साल भी अंगूर के बाग ने पूरी तरह धोखा दिया। क्रमश: ............

# ''उत्सव साहित्याचा''

प्रास्ताविक श्रीकांत पत्की

आदरणीय प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर, मंगलाताई वैष्णव, डॉ. शेषराव पठाडे, दासू वैद्य, पं. दीपक गिरी, ज्योतिर्मय साहित्य चे संपादक श्री. संजय व्यापारी, उपस्थित मान्यवर आणि साहित्य प्रेमी सर्वांना माझा नमस्कार,

ज्योतिर्मय साहित्य आणि प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित '' उत्सव साहित्याचा '' कार्यक्रमात मी आपणा सर्वांचे स्वागत करतो.

श्री. संजय व्यापारी यांनी शासकीय कला महाविद्यालय येथून बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स ही पदवी घेतली असून ज्योतिर्मय वृत्तपत्राचे ते सर्वेसर्वा आहेत. ते आर्टिस्ट आहेत, साहित्यिक, संपादक, डिझायनर, प्रूफ रीडर, आणि प्रकाशक सुद्धा आहेत. विशेष म्हणजे ते प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे सभासद आहेत याचा संस्थेला अभिमान आहे. हा मेळावा त्यांच्या संकल्पनेतूनच इथे साकार होत आहे. त्याबद्दल मी संजय व्यापारी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

मराठी साहित्य संमेलन हा मराठी लेखकांचा आणि वाचकांचा सोहळा असतो. साहित्या मध्ये मानवी जीवनातील भावभावना, विचार, अनुभव यांची सांगड घातली जाते. हे साहित्य चिरकाल टिकणारे असते. साहित्य जेंव्हा वाचकां पर्यन्त पोचते तेंव्हा वाचक ही विचार करण्यास आणि लिहिण्यास प्रवृत्त होतो. साहित्य हा सांस्कृतिक ठेवा आहे. आपण त्याचे जतन ही करतो. आजच्या आय टी च्या युगात पुस्तक साहित्य वाचनाची आवड कमी होत आहे. तरुणांसाठी डिजिटल साहित्य, ऑडिओ साहित्य उपलब्ध आहे ते त्यांनी वाचावे व ऐकावे यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

आज गीता भवन च्या इतिहासात प्रथमच ''उत्सव साहित्याचा'' हा साहित्यिकांचा मेळावा आयोजित केला आहे. या सोहळ्यासाठी प्रसिद्ध मान्यवर साहित्यिक एकत्र जमले आहेत. रसिकांना त्यांच्या साहित्याची चांगलीच मेजवानी मिळणार आहे.

ज्योतिर्मय साहित्य डिजिटल वृत्तपत्र च्या वर्ष पूर्ती निमित्त मी श्री. संजय व्यापारी व त्यांच्या संपूर्ण टीम चे हार्दिक अभिनंदन करतो व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा देतो.

धन्यवाद

- श्रीकांत पत्की
अध्यक्ष

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559